**सं. फौ. ख. क्रं. १०७/२०२२**
**शासन वि. पंकज**
**प्ली लगत निशाणी क्र. ११**

MHYA130002102022

| | |
|---|---|
| सं.फौ.ख.दाखल दिनांक | ०९/०२/२०२२ |
| सं.फौ.ख.नोंद दिनांक | ०९/०२/२०२२ |
| सं.फौ.ख.निकाल दिनांक | ०३/०६/२०२६ |
| कालावधी | **०४ वर्षे ०३ महिने २५ दिवस** |

# न्यायनिर्णय

( घोषित दिनांक ०३/०६/ २०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ) अन्वये शिक्षेस पात्र अपराधांबाबत संपरिक्षा चालविण्यात आली आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. आर. राऊत व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. एम. पवार यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. प्रकरणातील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्रं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दि. १४/०१/२०२२ रोजी १४.०० वाजताच्या सुमारास मौजे–चिरकुटा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ येथे गावाच्या शेत शिवारात आरोपी विनापरवाना व बेकायदेशीरित्या मोहा सडवा जवळ बाळगून त्यांची चोरटी विक्री करत असताना मिळून आला आणि महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ) अन्वये गुन्हा केला ? | नाही |

| अ. क्रं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | काय आदेश ? | अंतीम आदेशा प्रमाणे |

## का र ण मि मां सा

४. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेला दोष सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. ते म्हणजे जप्ती /घटनास्थळ पंच शेषराव परसराम चव्हाण (सा. क्र. १) हे तपासले आहे.

**मुददा क्रं. १ बाबत...**

५. जप्ती/ घटनास्थळ पंच शेषराव परसराम चव्हाण (सा. क्र. १) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उलट तपासात विचारले जावु शकणारे प्रश्न विचारण्यात आले. मात्र अभियोग पक्षास सहकार्य होईल असे काहीही त्यांनी सांगितले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा शाबीत करु शकला नाही.

६. प्रस्तूत खटल्यात अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही इतर साक्षीदारांचा पुरावा देण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. याउलट अभियोग पक्षाने नि. क्र. ०१ वर त्यांचा पुरावा बंद केल्याचे नमूद केले. तसेच अभियोग पक्षाने वर्दीदार यांना तपासले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष वर्दी शाबीत करु शकला नाही.

तसेच अभियोग पक्षाने याप्रकरणी रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे कथीतरित्या जप्त केलेले पदार्थ हे मादक पदार्थ होते असे दाखवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर येउ शकला नाही.

७. वरील बाबी, परिस्थीती व न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता आरोपीविरुध्द न्यायालयीन अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा आढळुन आला नसल्याचे दिसुन येते. अभियोग पक्ष आरोपीविरुध्द सदर गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला आहे. त्यामुळे मुद्दा क्रं. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले आहे.

**मुददा क्रं. २ बाबत...**

८. मुददा क्रं. १ च्या निष्कर्षप्राप्तीनुसार महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ) अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपीविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्यामुळे सदर अपराधामधुन सदर आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र. २ करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी- पंकज नामदेव चव्हाण यांची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (फ) अन्वये शिक्षेस पात्र अपराधांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम २५५(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

**२.** आरोपीचे बंधपत्रे व जामीनपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

**३.** जप्त मुद्देमाल कायदयाप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांच्याकडे अपील कालावधीनंतर सोपवण्यात येते.

**४.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम ४३७(अ), अन्वये आरोपीने रु. १५,०००/- चे बेल बॉन्ड जमा करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2026.06.03 16:27:22 +0530

दि. ०३/०६/२०२६
ठिकाणःदिग्रस.

**( बा. ना. गोडबोले )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
दिग्रस.

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 03/06/2026.

Transcribed On : 03/06/2026.

Checked & Signed On : 03/06/2026.

Date : 03/06/2026.
Place : Digras

**Sd/-**
**( N. S. Jadhao )**
Stenographer Grade-3
C.J.J.D. & J.M.F.C., Digras.